॥ श्री ॥

आपली भूमी... आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

✻ सुविचार ✻

स्वतःवर विश्वास ठेवा,
अर्धी लढाई तुम्ही तिथेच जिंकाल.

अहिल्यानगर | सोमवार, दि. २६ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक १०९ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

## फोडणी

अरुण महादेव वाळुंज । अहिल्यानगर, मो. ९६२३८६८३७२

### कोडी

आज नाहीतर उद्या
बदलेल काही चित्र
कोण कुणाचे विरोधक
कोण कुणाचे मित्र

सरळ सरळ नसतात
राजकारणातील कोडी
अर्थाला अर्थ असतो
उगीच पळत नाही घोडी

# ‘अर्थखाते’ राष्ट्रवादीला मिळणार!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक : छगन भुजबळ

**● मुंबई । वीरभूमी –**

महायुती सरकारमध्ये अर्थखाते राष्ट्रवादी काँग्रेसकडे सोपवण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सकारात्मक आहेत. मात्र, दुष्काळ निधीचे वाटप आणि इतर तांत्रिक बाबींमुळे या निर्णयाला काहीसा वेळ लागत आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.



अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते अर्थखात्याच्या मागणीसाठी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. मुख्यमंत्री यांच्या ‘वर्षा’ या शासकीय निवासस्थानी ही महत्त्वाची बैठक पार पडली असून, या भेटीमुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा रंगली आहे.

छगन भुजबळ म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी आमची अर्थखात्याबाबत सविस्तर चर्चा झाली आहे. महायुती स्थापन करताना ठरल्यानुसार हे खाते राष्ट्रवादी काँग्रेसलाच मिळाले पाहिजे, अशी भावना आमच्या आमदारांची आहे आणि ती रास्त आहे. मुख्यमंत्री या संदर्भात अत्यंत सकारात्मक आहेत. त्यांनी हे खाते सुनेत्रा पवार यांच्याकडे दिले जाईल असे आश्वस्त केले आहे. आगामी हिवाळी अधिवेशनापूर्वी सुनेत्रा पवार यांच्याकडे अर्थखात्याची जबाबदारी सोपवली जाण्याची दाट शक्यता आहे.

छगन भुजबळ म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याचा किंवा पक्षाच्या विलीनीकरणाचा कोणताही विषय आमच्या अजेंड्यावर नाही. यासंदर्भात कोणतीही चर्चा झालेली नाही. माध्यमांमध्ये यावरून तर्कवितर्क लावले जात असल्याने आम्ही यावर स्पष्टीकरण देत आहोत. तसेच, मंत्रिमंडळात इतर कोणतेही मोठे फेरबदल होणार नसून, पक्षाने केवळ अर्थखात्याचीच मागणी मुख्यमंत्र्यांकडे लावून धरल्याचे त्यांनी सांगितले.

छगन भुजबळ म्हणाले की, सध्या राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मोठा निधी द्यावा लागणार आहे. यावर सरकारचा सखोल अभ्यास आणि नियोजन सुरू असल्यामुळेच अर्थखात्याच्या निर्णयाला वेळ लागत आहे. तसेच, पक्षातील एका रिक्त मंत्रीपदाच्या शपथविधीबाबत विचारले असता, फक्त एका मंत्र्याचा वेगळा शपथविधी होईल असे वाटत नाही. भाजपचेही काही मंत्रीपद रिक्त असून संपूर्ण मंत्रिमंडळ विस्तार एकाच वेळी होईल.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोअर कमिटीची बैठक

■ कोरेगाव पार्क (मुंढवा) येथील ४० एकर जमीन गैरव्यवहार प्रकरणात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या दोन स्वीय सहायकांना पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने नोटीस बजावल्याची मोठी बातमी समोर आली आहे. या घडामोडीनंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली असून, या पार्श्वभूमीवर २५ ऑक्टोबर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या ‘देवगिरी’ बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची महत्त्वाची कोअर कमिटीची बैठक पार पडली.

## दुष्काळातही हिवाळी अधिवेशनाच्या खर्चात ४२ कोटींची वाढ

**● मुंबई । वीरभूमी –**

राज्यात दिवसागणिक दुष्काळाची दाहकता तीव्र होत असल्याचे चित्र आहे. तर आगामी काळात बहुतांश भागात परिस्थिती अधिक भीषण होण्याची भीती व्यक्त केली जात असताना राज्य सरकारकडून ठोस उपाययोजना राबवल्या जात आहे. सोबतच प्रशासनाच्या विविध विभागात खर्चकपातीचे निर्देशही दिले जात आहे. असे असताना दुसरीकडे मात्र, नागपूर येथे होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या तयारीसाठीचे खर्च अचानक ४२ कोटी रुपयांनी वाढवण्यात आल्याची माहिती आहे. आवश्यक अतिरिक्त कामांसाठी ही वाढ करण्यात आल्याची माहिती आहे. तर वाढवलेल्या ४२ कोटींच्या खर्चामुळे अधिवेशनाच्या तयारीसाठीचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा एकूण खर्च १२९ कोटींपर्यंत वाढला आहे. त्यामुळे याच मुद्द्यावरून आता राजकारण तापण्याची शक्यता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ऑगस्ट महिन्यात सार्वजनिक बांधकाम विभागाने हिवाळी अधिवेशनाच्या तयारीसंदर्भातील खर्चाचा प्राथमिक अंदाज तयार केला होता. तो १४५ कोटी रुपयांचा होता. मात्र नंतर दुष्काळाची तीव्रता वाढल्यामुळे सर्वच विभागांना खर्च कपातीचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर हिवाळी अधिवेशनाच्या तयारीसाठीचा सार्वजनिक बांधकाम विभागाचा सुधारित खर्च ८७ कोटी रुपयांपर्यंत कमी करण्यात आला होता. दोन दिवसांपूर्वी पुन्हा एकदा सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिरिक्त आवश्यक कामांसाठी ४२ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी दिली आहे. त्यामुळे आता हिवाळी अधिवेशनाच्या तयारीसाठीचा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केला जाणारा खर्च १२९ कोटी रुपयांपर्यंत वाढला आहे.

दरम्यान, नागपुरात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हिवाळी अधिवेशन संदर्भात विविध शासकीय इमारतींची डागडुजी तसेच रंगरंगोटीवर खर्च केला जातोय. रवी भवन, नाग भवन, विधान भवन यासह इतर प्रशासकीय इमारतींमध्ये आवश्यक सोयी निर्माण करण्यासाठी खर्च केला जातोय.

## SPOT NEWS

### सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण

**● मुंबई** – दिवाळी आणि धनत्रयोदशीच्या पार्श्वभूमीवर सोने आणि चांदी खरेदी करणाऱ्यांसाठी आता सुवर्णसंधी आहे. या आठवड्यात केवळ चार दिवसांत चांदीच्या दरात १६,००० रुपयांपेक्षा जास्त घसरण झाली, तर वायदे बाजारात (फ्युचर्स ट्रेडिंग) ती आता तिच्या उच्चांकी दरापेक्षा सुमारे २.२४ लाख रुपये कमी दराने उपलब्ध आहे. त्यामुळे सोनेचांदी स्वस्त झाले आहेत. सणासुदीच्या काळात सोने आणि चांदीच्या दरात सातत्याने घसरण होत आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंज पासून ते देशांतर्गत बाजारापर्यंत मौल्यवान धातूंच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. गेल्या आठवड्यात केवळ चार दिवसांच्या व्यवहारात चांदीचा दरवाढीचा फुगा फुटला आणि देशांतर्गत बाजारात तिच्या किमतीत १६,००० पेक्षा जास्त घसरण झाली. दरम्यान, एमसीएक्सवर चांदी आता तिच्या उच्चांकी किमतीपेक्षा अंदाजे २.२४ लाख कमी किमतीत उपलब्ध आहे. तसेच सोन्याच्या किमतीतही मोठी घसरण झाली आहे.

### १ नोव्हेंबरला दिल्लीत ‘वोट बचाओ, देश बचाओ’ महारॅली

**● नवी दिल्ली** – आमचे वोट चोरले जात आहे आणि हे आम्ही कोणत्याही परिस्थितीत शांतपणे सहन करणार नाही. मतदार याद्यांमधून नावे वगळण्यात आली, नियम-कायद्यांचे उल्लंघन करण्यात आले आणि प्रश्न विचारणाऱ्यांवर लाठीमार करण्यात आला, असा आरोप करत राहुल गांधी यांनी १ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर आयोजित ‘वोट बचाओ, देश बचाओ’ जनमार्च आणि महारॅलीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## कर्जतमधील टोरंट पॉवरविरोधातील वृक्षतोडीविरोधात राज ठाकरे मैदानात; २७ ऑक्टोबरला घेणार सभा

**● मुंबई । वीरभूमी –**

रायगड जिल्ह्यातील कर्जत परिसरामध्ये ‘टोरंट पॉवर’च्या प्रस्तावित प्रकल्पासाठी सुरू असलेल्या बेसुमार वृक्षतोडीविरोधात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. या पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या वृक्षतोडीला कडाडून विरोध करण्यासाठी राज ठाकरे स्वतः मैदानात उतरणार असून, येत्या २७ ऑक्टोबर रोजी कर्जतमध्ये त्यांची जाहीर सभा होणार आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने घेतलेल्या भेटीनंतर राज ठाकरे यांनी हे आश्वासन दिल्याची माहिती ॲडव्होकेट कैलास मोरे यांनी दिली आहे.

कर्जत आणि लगतच्या पट्ट्यात टोरंट पॉवरच्या प्रकल्पाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर वनसंपत्ती नष्ट केली जात असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांकडून केला जात आहे. या वृक्षतोडीमुळे निसर्गाचे नुकसान होत असून पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे. स्थानिक पातळीवर आंदोलन करूनही प्रशासनाकडून योग्य दखल न घेतली गेल्याने ग्रामस्थांनी थेट ‘शिवतीर्थ’ गाठत मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भेट घेतली.

या भेटीदरम्यान ग्रामस्थांनी आणि ॲड. कैलास मोरे यांनी कर्जतमधील वस्तुस्थिती आणि हजारो झाडांवर चालवल्या जाणाऱ्या कुऱ्हाडीची सविस्तर माहिती राज ठाकरे यांच्यासमोर मांडली.

या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना ॲड. कैलास मोरे म्हणाले, कर्जतमध्ये जो प्रकल्प उभारला जात आहे. त्यासाठी केली जात असलेल्या झाडांच्या कत्तलीला महाराष्ट्रासह देशभरातून विरोध केला जात आहे. राज ठाकरे यांनी आमच्याकडून हा सगळा विषय समजून घेतला. २७ ऑक्टोंबरला ते लाईव्ह सभा घेत आहेत. राज ठाकरेंनी या विषयात पूर्ण ताकदीने स्थानिकांसोबत राहण्याचा शब्द दिला, असेही मोरे यांनी सांगितले.

## ४ नोव्हेंबरपूर्वी ९२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार जमा होणार : कृषीमंत्री

**● मुंबई । वीरभूमी –**

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिवाळीपूर्वी एक अत्यंत आनंदाची बातमी समोर आली आहे. राज्य शासनाकडून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात प्रत्येकी ५ हजार रुपयांची मदत थेट जमा केली जाणार आहे. यासाठी कोणतीही किचकट ई-केवायसी करण्याची गरज उरलेली नाही. ४ नोव्हेंबरपूर्वी मदतीची रक्कम पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असल्याचा विश्वास कृषीमंत्र्यांनी बोलताना व्यक्त केला आहे.

दिवाळीआधी जमा होणारी ५ हजार रूपयांची मदत राज्यातील ९२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. ‘ॲग्रीस्टॅक’ क्रमांकावरून शेतकऱ्यांना ५ हजार रुपयांची आर्थिक मदत थेट बँक खात्यात जमा केली जाणार आहे. या मदतीसाठी शेतकऱ्यांना वेळखाऊ व किचकट ‘ई-केवायसी’ करण्याची गरज नाही. यामुळे मदत मिळण्यात शेतकऱ्यांना कोणताही विलंब होणार नाही. पंचनामे करतानाच प्रत्येकाचा ॲग्रीस्टॅक क्रमांक व बँक खात्याची माहिती घेण्यात आली आहे. त्यामुळे ४ नोव्हेंबरपूर्वी मदतीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होईल, असा ठाम विश्वास कृषीमंत्री दत्तात्रेय भरणे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला आहे.

राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी प्रत्येकी पाच हजार रुपयांची मदत दिली जाणार असून, ही रक्कम थेट खात्यात जमा होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील कॅबिनेट बैठकीनंतर हे जाहीर केले असून, त्यासंबंधीचा शासन निर्णय पुढच्या आठवड्यात निघेल, असे कृषीमंत्र्यांनी स्पष्ट केले.

तसेच, केंद्राच्या आपत्ती निवारणातून निधी प्राप्त झाल्यावर बाकीची नुकसान भरपाई वितरीत केली जाणार आहे. सध्या शासनाने प्रत्येक विभागाच्या निधीला २० टक्क्यांची कात्री लावली असून, तो निधी दुष्काळाची मदत व दुष्काळ निवारणासाठी वापरला जाणार असल्याची माहितीही कृषीमंत्र्यांनी दिली आहे.

# मुळा धरणाचे एकाच आवर्तनात ८ हजार दलघफू पाणी खर्च!

## गळती आणि पाणीवाटपातील त्रुटींवर प्रश्नचिन्ह । आज जिल्हाधिकारी कार्यालयात कालवा सल्लागार समितीची बैठक

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

एकीकडे पावसाची अनिश्चितता, दुसरीकडे दुष्काळाचे सावट आणि भविष्यातील पिण्याच्या पाण्याची चिंता असताना मुळा धरणातील पाण्याच्या नियोजनाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. खरीप हंगामातील एका आवर्तनासाठी तब्बल ७ हजार ८४४ दशलक्ष घनफूट (दलघफू) पाणी वापरण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात वापरण्यात आलेल्या पाण्यापैकी प्रत्यक्ष सिंचनासाठी किती पाणी पोहोचले आणि किती पाणी गळती, अनियंत्रित उपसा अथवा वितरणातील त्रुटींमुळे वाया गेले, असा सवाल उपस्थित होत आहे. धरणात सध्या १६ हजार ९४६ दलघफू पाणीसाठा असल्याचे सांगितले जात असले, तरी त्यातील मृतसाठा वगळता प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध असलेले पाणी मर्यादित आहे. त्यामुळे आगामी काळातील पाणीवाटपाचे नियोजन प्रशासनासाठी महत्त्वाचे ठरणार आहे.

मुळा धरणातून २१ ऑगस्ट रोजी डाव्या कालव्यातून १०० क्युसेक, तर उजव्या कालव्यातून ५०० क्युसेक विसर्गाने पाणी सोडण्यात आले होते. त्यावेळी धरणातील एकूण पाणीसाठा २५ हजार १५८ दलघफू होता. त्यानंतर २४ ऑगस्ट रोजी डाव्या कालव्याचा विसर्ग २५० क्युसेक, तर उजव्या कालव्याचा विसर्ग ११०० क्युसेक करण्यात आला. पुढे उजव्या कालव्याचा विसर्ग १६०० क्युसेकपर्यंत वाढविण्यात आला.

गेल्या दोन महिन्यांपासून कमी-अधिक प्रमाणात सुरू असलेल्या या आवर्तनामुळे धरणातील पाणीसाठ्यात लक्षणीय घट झाली. २३ ऑक्टोबरपर्यंत धरणातील एकूण साठा १७ हजार ०३३ दलघफूवर आला. म्हणजेच या कालावधीत सुमारे ८ हजार १२५ दलघफू पाणीसाठा कमी झाला. या पाण्याचा वापर शेतीसाठी वितरण, बंधारे भरणे आणि अन्य कारणांसाठी झाला आहे. मात्र, प्रत्यक्ष सिंचनासाठी किती पाणी उपलब्ध झाले, कालव्यांमधून किती गळती झाली आणि वितरणादरम्यान किती नुकसान झाले, याचा सविस्तर हिशोब समोर येणे आवश्यक आहे.

मुळा धरणात एकूण क्षमतेच्या ६५.१७ टक्के पाणीसाठा असल्याची नोंद आहे. त्यामध्ये १२ हजार ४४६ दलघफू जिवंत साठा, तर ४ हजार ५०० दलघफू मृतसाठा आहे. एकूण पाणीसाठ्याचे प्रमाण पाहता दिलासा मिळत असला, तरी प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध असलेल्या जिवंत साठ्याचा विचार करता प्रत्येक आवर्तनाचे नियोजन काटेकोरपणे करणे आवश्यक आहे.

कोतूळ येथून धरणाकडे होणारी पाण्याची आवक १० ऑक्टोबर रोजी बंद झाल्याची नोंद असली, तरी त्यानंतरही काही प्रमाणात आवक सुरू होती. आगामी काळात धरणात किती नवीन पाणी जमा होईल, याबाबत निश्चितता नसल्याने उपलब्ध साठ्याचा वापर करताना प्रशासनाला सावध भूमिका घ्यावी लागणार आहे.

कालव्यांची दुरवस्था, पोटचाऱ्यांची अपुरी देखभाल आणि पाणीगळतीचे प्रश्न कायम असतील, तर धरणातून आवर्तन सोडूनही अपेक्षित सिंचन साध्य होणार कसे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. धरणातून सोडलेले पाणी शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचते का, याचे स्वतंत्र मूल्यमापन होणे गरजेचे आहे. केवळ पाणी सोडण्याचे प्रमाण न पाहता प्रत्यक्ष शेतापर्यंत पोहोचलेल्या पाण्याचा हिशोब ठेवण्याची आवश्यकता आहे.

दरम्यान, मुळा नदीपात्रातील डिग्रस, मानोरी, मांजरी आणि वांजुळपोळी येथील चार कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे भरण्यासाठी धरणातून ४५५.२७ दलघफू पाणी सोडण्यात आले आहे. नदीपात्रातील हे बंधारे भरल्याने परिसरातील पाणी उपलब्धता आणि भूजलपातळी सुधारण्यास मदत होऊ शकते. मात्र, त्यासाठी सोडण्यात येणाऱ्या पाण्याचे नियोजनही तितकेच काटेकोर असणे आवश्यक आहे.

खरीप आवर्तनासाठी आतापर्यंत ७ हजार ८४४ दलघफू पाणी वापरण्यात आल्याची माहिती आहे. कालव्याच्या शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचावे आणि वितरणात शिस्त राहावी, यासाठी प्रशासनाने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. महावितरणकडून शटडाऊन घेण्यात आला असून, पाणीवाटपावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध पथके नियुक्त करण्यात आली आहेत.

जलाशयातून होणारा अनधिकृत पाणीउपसा रोखण्यासाठी दोन स्वतंत्र पथके तयार करून कारवाईही सुरू करण्यात आली आहे. याशिवाय धरणातून पिण्यासाठी पाणी घेणाऱ्या ११ बिगर सिंचन ग्राहकांच्या पाणीवापरात १० टक्के कपात करण्यात आली आहे. उपलब्ध पाण्याचा ताळमेळ राखण्यासाठी प्रशासनाला कपातीचे निर्णय घ्यावे लागत असल्याने आगामी काळातील पाणीवाटपाचे आव्हान अधिक स्पष्ट झाले आहे.

शेती, पिण्याचे पाणी आणि औद्योगिक गरजा यांचा समतोल राखताना कोणत्या घटकाला किती पाणी द्यायचे, याचा प्राधान्यक्रम निश्चित करणे अपरिहार्य ठरणार आहे. त्यासाठी पाण्याचा वापर, वितरणातील नुकसान आणि भविष्यातील गरजा यांचा एकत्रित विचार करावा लागणार आहे.

आज, सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात कालवा सल्लागार समितीची बैठक होणार असून या बैठकीत आगामी पाणीवाटपाचे नियोजन निश्चित होण्याची अपेक्षा आहे. या बैठकीत किती पाणी सोडायचे, याचा निर्णय घेण्याबरोबरच उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर कसा करता येईल आणि संभाव्य नासाडी कशी रोखता येईल, यावर ठोस कृती आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

SPOT NEWS

## भैय्या बॉक्सर यांना 'विश्व शांतीदूत' पुरस्कार प्रदान!

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

सामाजिक बांधिलकी जपत गरजवंतांना मदतीचा हात देणारे सामाजिक कार्यकर्ते भैय्या बॉक्सर यांना 'विश्व शांतीदूत पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. फ्रीडम फाउंडेशनच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यात त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेण्यात आली. हेल्पिंग हॅन्ड्स युथ फाउंडेशनच्या माध्यमातून शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना हा सन्मान करण्यात आला. फ्रीडम फाउंडेशन आणि ग्लोरिअस ग्लोबल सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, फ्रीडम फाउंडेशनचे संस्थापक बिशप डॉ. प्रदीप वाघमारे यांच्या पुढाकाराने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. समाजात शांतता, बंधुभाव, मानवता आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ११ व्यक्तींना 'विश्व शांतीदूत पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी बिशप प्रा. डॉ. अनिश विजागत आणि प्रा. ज्युलिया विजागत उपस्थित होते. फ्रीडम फाउंडेशनचे संस्थापक बिशप डॉ. प्रदीप वाघमारे आणि विश्वस्त बिशप डॉ. साधना कदम यांच्या हस्ते पुरस्कारार्थींना सन्मानित करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे व सहकारी म्हणून जॉन्सन पॉलूस, राजेंद्र कदम, प्राजक्ता राठोड, डॉ. रुपाली साळवी आणि एलिझाबेथ लोंढे यांची विशेष उपस्थिती होती. कोरोना महामारीच्या कठीण काळात अनेकांना अन्नधान्य आणि दैनंदिन गरजांच्या वस्तू मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. अशा परिस्थितीत भैय्या बॉक्सर यांनी पुढाकार घेत अनेक बेवारस आणि गरजू व्यक्तींना मदतीचा हात दिला.

## शिर्डीच्या राजवाडा परिसरातील
# पात्र रहिवाशांना मालकी हक्काचे पट्टे वितरित

### शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमणे नियमाकुल । डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते आदेशांचे वितरण

● **शिर्डी । वीरभूमी –**

शिर्डी शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधील राजवाडा परिसरात शासकीय जागेवर निवासी स्वरूपात असलेली अतिक्रमणे नियमाकुल करण्याच्या प्रक्रियेला महत्त्वपूर्ण टप्पा मिळाला आहे. या परिसरातील पात्र लाभार्थी नागरिकांना त्यांच्या निवासस्थानांबाबत मालकी हक्काचे पट्टे देण्यासंदर्भातील आदेश भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजयदादा विखे पाटील यांच्या हस्ते वितरित करण्यात आले. अनेक वर्षांपासून शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमणांच्या प्रश्नामुळे निर्माण झालेली अनिश्चितता दूर करण्याच्या दृष्टीने या निर्णयाकडे पाहिले जात आहे.

या कार्यक्रमाला शिर्डीच्या नगराध्यक्षा सौ. जयश्री थोरात यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते. तसेच कमलाकर कोते, नितीन कोते, प्रतापराव जगताप आणि अधीक्षक भूमी अभिलेख डॉ. योगेश थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी राजवाडा परिसरातील लाभार्थी नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राजवाडा परिसरातील नागरिकांच्या



निवासाचा प्रश्न आणि त्यांच्या मालकी हक्कांशी संबंधित बाबी महत्त्वाच्या मानल्या जातात. शासकीय जागेवर वास्तव्यास असलेल्या पात्र कुटुंबांना त्यांच्या निवासाबाबत अधिकृत हक्क मिळाल्यास त्यांना सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यास मदत होते. या पार्श्वभूमीवर निवासी अतिक्रमणे नियमाकुल करून लाभार्थ्यांना मालकी हक्काचे पट्टे देण्याच्या प्रक्रियेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते आदेशांचे वितरण झाल्याने लाभार्थी नागरिकांना त्यांच्या निवासस्थानासंदर्भातील हक्क निश्चित होण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण कागदपत्रे मिळाली. या प्रक्रियेमुळे संबंधित नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमणे नियमाकुल करताना पात्र लाभार्थ्यांना कायदेशीर प्रक्रियेनुसार हक्क उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा महत्त्वाचा भाग आहे.

भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमामुळे निवासी अतिक्रमणे नियमाकुल करण्याच्या प्रक्रियेत प्रशासनाची भूमिका महत्त्वाची असल्याचे अधोरेखित झाले. संबंधित आदेशांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांच्या निवासस्थानांबाबतचे हक्क अधिकृत करण्याच्या प्रक्रियेला चालना मिळाली आहे.

घर हे प्रत्येक कुटुंबाच्या सुरक्षिततेचे आणि स्थैर्याचे महत्त्वाचे साधन असते. त्यामुळे अनेक वर्षांपासून एका ठिकाणी वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या निवासाचा प्रश्न मार्गी लागणे, ही त्यांच्या दैनंदिन जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाची बाब ठरते. राजवाडा परिसरातील पात्र लाभार्थ्यांना मालकी हक्काचे पट्टे देण्यासंदर्भातील आदेशांचे वितरण हा याच प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

या कार्यक्रमामुळे शिर्डी शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधील राजवाडा परिसरातील संबंधित नागरिकांच्या प्रश्नाला प्रशासकीय प्रक्रियेद्वारे दिलासा मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे. कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी आणि लाभार्थी नागरिकांच्या उपस्थितीत आदेशांचे वितरण करण्यात आले.

## वंचित भगिनींसाठी स्नेहालयाचा 'माहेरची साडी' उपक्रम

### किराणा किट, दिवाळी फराळ आणि आरोग्य किटसाठी मदतीचे आवाहन । उपक्रमाचे यंदा २१ वे वर्ष

● **निघोज । वीरभूमी –**

दिवाळीचा आनंद समाजातील वंचित आणि निराधार महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्नेहालय संस्थेच्या वतीने 'माहेरची साडी' हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदा या उपक्रमाचे २१ वे वर्ष असून, रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी स्नेहालयात हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. साड्यांची व्यवस्था पूर्ण झाली असून, आता महिलांना किराणा किट, दिवाळीचा फराळ आणि आरोग्य किट उपलब्ध करून देण्यासाठी दात्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



दिवाळी म्हणजे प्रकाश, आनंद, प्रेम आणि आपुलकीचा सण. प्रत्येक घरात दिव्यांची रोषणाई होते, गोडधोड पदार्थांचा सुगंध दरवळतो आणि नात्यांमधील स्नेह अधिक दृढ होतो. मात्र, समाजातील अनेक वंचित महिलांच्या आयुष्यात आजही संघर्ष कायम आहे. त्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण फुलावेत, चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटावे आणि त्यांना मायेचा आधार मिळावा, या उद्देशाने स्नेहालयाचा 'माहेरची साडी' उपक्रम राबविला जातो.

हा उपक्रम म्हणजे केवळ वस्तुरूपाने मदत नव्हे, तर निराधार भगिनींना मायेची ऊब आणि आपुलकीची जाणीव करून देण्याचा प्रयत्न आहे. आपल्या छोट्याशा योगदानातून त्यांची दिवाळी अधिक आनंददायी होऊ शकते.

**मदतीसाठी निश्चित केलेली रक्कम**

किराणा किट : १,९७६ रुपये प्रति किट

दिवाळीचा फराळ : २०५ रुपये प्रति किलो

आरोग्य किट : १,१९७ रुपये प्रति किट

आरोग्य किटमध्ये साबण, तेल, कंगवा, शाम्पू, उटणे, टूथपेस्ट आणि टूथब्रश यांसारख्या दैनंदिन वापरातील आवश्यक वस्तूंचा समावेश आहे.

मदतीची रक्कम मोठी की छोटी, यापेक्षा ती प्रेमाने आणि सामाजिक बांधिलकीतून केली जाते, हे अधिक महत्त्वाचे आहे. प्रत्येक योगदानातून एखाद्या भगिनीच्या आयुष्यात आनंदाचा दिवा उजळू शकतो. त्यामुळे या दिवाळीत आपल्या घरासोबतच वंचित महिलांच्या जीवनातही आनंदाचे रंग भरावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

देणगी देण्यासाठी आणि पावती मिळविण्यासाठी ९०११०२०१७८ / ९०११०२८८२८ या क्रमांकावर संपर्क साधावा. देणगी पाठवल्यानंतर व्यवहाराचा स्क्रीनशॉट, नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, पावतीसाठी आवश्यक ओळखविषयक माहिती आणि ई-मेल आयडी संबंधित संपर्क क्रमांकावर पाठवावा.

स्नेहालयाच्या उडान प्रकल्पाचे व्यवस्थापक प्रवीण कदम आणि सामाजिक कार्यकर्ते भगवान गायकवाड यांनी या उपक्रमात सहभागी होऊन वंचित भगिनींची दिवाळी आनंदमय करण्यासाठी मदतीचा हात पुढे करण्याचे आवाहन केले आहे.

## भंडारदऱ्याच्या निसर्गरम्य सानिध्यात रंगली कवितांची मैफल!

### रानकवी तुकाराम धांडे यांच्या ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या कवितांना रसिकांची उत्स्फूर्त दाद

● **अकोले । वीरभूमी–**

निसर्गरम्य भंडारदऱ्याचा परिसर, कोजागरी पौर्णिमेची पूर्वसंध्या आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव शब्दांतून उलगडणाऱ्या कवितांची बरसात अशा प्रसन्न साहित्यिक वातावरणात कवी आणि साहित्यप्रेमींची मैफल रंगली. रानकवी तुकाराम धांडे यांच्या ग्रामीण व आदिवासी जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या कवितांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गावाकडच्या जगण्याचे वास्तव, मातीशी असलेले नाते आणि आदिवासी संस्कृतीचे प्रतिबिंब त्यांच्या कवितांतून प्रभावीपणे उमटले. या काव्यरचनांना रसिकांनी टाळ्यांच्या गजरात उत्स्फूर्त दाद दिली.

भंडारदऱ्याच्या निसर्गरम्य परिसरात आयोजित या काव्यमैफलीला रानकवी तुकाराम धांडे, निवृत्त पोलिस अधिकारी सूर्यकांत बांगर, प्राचार्य बाबा देशमुख, माजी प्राचार्य श्रीनिवास एलमामे, शांताराम काळे, प्राचार्य सतीश काळे, सुरेश गभाले, प्रफुल्ल बांगर यांच्यासह अनेक काव्यप्रेमी उपस्थित होते. निसर्गाच्या साक्षीने शब्द, भावना आणि जीवनानुभव यांचा सुरेख संगम या मैफलीत अनुभवायला मिळाला.

रानकवी तुकाराम धांडे यांच्या कवितांमधून ग्रामीण आणि आदिवासी समाजाचे जगणे प्रभावीपणे व्यक्त झाले. गावखेड्यातील साधेपणा, माणसांमधील जिव्हाळा, निसर्गाशी असलेले अतूट नाते आणि ग्रामीण जीवनातील विविध भावभावना त्यांच्या कवितांतून उलगडल्या. बोलीभाषेतील सहजता आणि अनुभवांतून आलेली अस्सलता हे त्यांच्या कवितांचे वैशिष्ट्य ठरले. त्यामुळे त्यांच्या शब्दांनी श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेतला.

साहित्य, निसर्ग आणि माणुसकी यांची सांगड घालणाऱ्या या उपक्रमामुळे कवी आणि साहित्यप्रेमींना एकत्र येण्याची संधी मिळाली. दैनंदिन धावपळीपासून दूर निसर्गाच्या कुशीत कवितांचा आस्वाद घेताना उपस्थितांनी साहित्याविषयीची आपली आवड व्यक्त केली. ग्रामीण व आदिवासी साहित्याला व्यासपीठ मिळावे आणि नव्या पिढीत काव्याची गोडी निर्माण व्हावी, यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व या मैफलीतून अधोरेखित झाले.

श्री स्वामी समर्थ शिक्षण संस्था आणि चिंचोडी ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने या काव्यमैफलीचे आयोजन करण्यात आले होते. विनायक साळवे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रफुल्ल बांगर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या काव्यमैफलीत निवृत्त पोलिस अधिकारी सूर्यकांत बांगर यांनीही कविता सादर करून रसिकांची दाद मिळविली. साहित्य आणि कवितेविषयीचा उत्साह पाहून त्यांनी पुढील वर्षी अधिक व्यापक स्वरूपात भव्य काव्यसंमेलन आयोजित करण्याची घोषणा केली. त्यामुळे भंडारदऱ्याच्या निसर्गरम्य परिसरात पुढील वर्षी मोठा साहित्यिक सोहळा रंगण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी नागरिकांनी अर्ज करावेत : नगराध्यक्ष पराग संधान

● **कोपरगाव । वीरभूमी –**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार, कोपरगाव नगरपरिषदेच्या हद्दीतील शासकीय जमिनीवरील पात्र निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत, असे आवाहन नगराध्यक्ष पराग संधान यांनी केले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कोपरगाव नगरपरिषद निवडणुकीदरम्यान मा. आ. स्नेहलताताई कोल्हे आणि आ. विवेक कोल्हे यांच्या उपस्थितीत आयोजित प्रचारसभेत नगरपरिषद हद्दीतील पात्र निवासी अतिक्रमणे नियमित करून नागरिकांना त्यांच्या हक्काचे उतारे देण्याची ग्वाही दिली होती. या आश्वासनामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या नागरिकांच्या प्रश्नाला न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली होती. मा. आ. स्नेहलताताई कोल्हे आणि आ. विवेक कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीने कोपरगाव नगरपरिषद निवडणुकीत ऐतिहासिक विजय मिळविला. आता नागरिकांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात येत असून, पात्र निवासी अतिक्रमणे शासनाच्या नियमानुसार नियमित करण्याची प्रक्रिया पुढे नेली जात आहे. पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन नगराध्यक्ष पराग संधान यांनी केले.

यासंदर्भात सोमवार, दि. १९ ऑक्टोबर २०२६ रोजी कोपरगाव नगरपरिषद कार्यालयात नगराध्यक्ष पराग संधान, मुख्याधिकारी अजित निकत, संतोष भट्टड आणि सर्व नगरसेवक यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीत १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी अस्तित्वात असलेली पात्र निवासी अतिक्रमणे शासनाच्या निर्धारित अटी व शर्तींनुसार नियमित करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

अतिक्रमण नियमित करण्यासाठी नागरिकांनी विहित नमुन्यातील अर्ज संपूर्ण माहितीसह भरून सादर करावा. अर्जासोबत आधार कार्ड किंवा पॅन कार्ड यापैकी एक कागदपत्राची छायांकित प्रत, अतिक्रमण १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी अस्तित्वात असल्याचे पुरावे, मतदार यादीतील नावाची प्रत, वीज बिल आणि उपलब्ध असल्यास मालमत्ता कराची पावती जोडावी. तसेच विहित नमुन्यातील शपथपत्र सादर करणे आवश्यक आहे.

पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज कोपरगाव नगरपरिषद कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन नगराध्यक्ष पराग संधान आणि मुख्याधिकारी अजित निकत यांनी केले आहे.

## राज्य प्राथमिक शिक्षक बँकांच्या
# समन्वयकपदी बापूसाहेब तांबे यांची निवड

### कल्याण येथे झालेल्या बैठकीत एकमताने निवड

● **पारनेर । वीरभूमी–**

राज्यातील सर्व प्राथमिक शिक्षक बँकांच्या समन्वयकपदी शिक्षक नेते बापूसाहेब तांबे यांची एकमताने निवड करण्यात आली. कल्याण जनता सहकारी बँक, कल्याण (मुंबई) येथे राज्यातील प्राथमिक शिक्षक बँकांच्या पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. राष्ट्रीय सहकार धोरण उच्चस्तरीय समितीचे सदस्य तथा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया आणि नाबार्डचे संचालक सतीश मराठे यांच्या उपस्थितीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

अहिल्यानगर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील प्राथमिक शिक्षक बँकांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची या बैठकीला उपस्थिती होती. अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे काम राज्यातील अन्य बँकांसाठी आदर्शवत असल्याने आणि बापूसाहेब तांबे हे बँकेचे नेतृत्व प्रभावीपणे करत असल्याने सांगली बँकेचे नेते अविनाश गुरव यांनी त्यांच्या निवडीचा ठराव मांडला. सातारा, कोल्हापूर आणि अहिल्यानगर बँकांच्या पदाधिकाऱ्यांनी या ठरावाला अनुमोदन दिले. त्यानंतर सतीश मराठे आणि उपस्थित प्रतिनिधींच्या हस्ते तांबे यांचा सत्कार करण्यात आला.



बैठकीत बापूसाहेब तांबे यांनी पगारदार नोकरांच्या सहकारी बँकांसमोरील विविध प्रश्न मांडले. नवीन शाखा सुरू करण्यासाठी असलेली एक हजार सभासदांची अट रद्द करावी, सभासदसंख्या कमी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर कर्जासाठी तारण कर्जाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, तसेच बँकांना उत्पन्नाचे अन्य स्रोत मर्यादित असल्याने नफ्यावरील कर सवलत द्यावी, अशा मागण्या त्यांनी केल्या. या सवलतींमुळे बँकांना सभासदांना अधिक लाभांश देता येईल, अशी भूमिका त्यांनी मांडली.

या मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही करण्यासाठी लवकरच रिझर्व्ह बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित करण्यात येईल, असे आश्वासन सतीश मराठे यांनी दिले.

सतीश मराठे यांची एफएसआयबीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल, तसेच संपदाताई कुळकर्णी यांची कल्याण जनता सहकारी बँकेच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेचे नवनिर्वाचित संचालक प्रकाश लेले, महाव्यवस्थापक मिलिंद पाठक, विजय गायकवाड आणि सहकार भारतीचे कोकण विभाग प्रमुख राजेंद्र ठाणगे यांचाही सन्मान करण्यात आला.

बैठकीस डॉ. संदीप मोटे, संचालक कल्याण लवांडे, कैलास सहाणे, बाळासाहेब कापसे, सातारा बँकेचे चेअरमन विशाल कणसे, नितीन शिर्के, कोल्हापूर बँकेचे माजी चेअरमन सुनील एडके, शिवाजी रोडे, विद्यमान चेअरमन बाबुराव परीट, अविनाश गुरव, अमोल शिंदे आदी उपस्थित होते.

# SPOT NEWS

## अहिल्यानगर जिल्हा बँकेच्या १० जागांसाठी २ नोव्हेंबरला मतदान; २१ पैकी ११ जागा बिनविरोध

**● कोपरगाव । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत २१ पैकी ११ जागा बिनविरोध झाल्या असून, उर्वरित १० जागांसाठी २ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात या जागांवरील लढतींकडे जिल्ह्यातील सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. विशेषतः राखीव प्रवर्गातील सहा जागांसाठी संपूर्ण जिल्ह्यातील ३ हजार ९१० मतदार मतदानास पात्र असल्याने या निवडणुकीला महत्त्व प्राप्त झाले आहे. महिला राखीव प्रवर्गातील दोन जागांसाठी सहा महिला उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. यामध्ये अहिल्यानगर दक्षिण विभागातील श्रीगोंदा, कर्जत, नगर आणि पाथर्डी या तालुक्यांतून पाच महिला उमेदवार निवडणूक लढवत आहेत, तर उत्तर विभागातून एक महिला उमेदवार रिंगणात आहे. दक्षिण विभागातून पाच महिला उमेदवार मैदानात उतरल्याने मतांची मोठ्या प्रमाणात विभागणी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकाच विभागातील पाच उमेदवारांमध्ये मतांचे विभाजन झाल्यास त्याचा निवडणुकीच्या निकालावर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, उत्तर विभागातून केवळ एकच महिला उमेदवार निवडणूक लढवत असल्याने त्यांना या परिस्थितीचा फायदा होण्याची शक्यता राजकीय वर्तुळातून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे महिला राखीव प्रवर्गातील या दोन जागांसाठीची लढत लक्षवेधी ठरणार आहे. कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, संगमनेर आणि नेवासा या तालुक्यांतील मतदान निवडणुकीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. या तालुक्यांतील मतदारांचा सहभाग आणि मतदानाचा कल यावर संबंधित लढतींचे चित्र स्पष्ट होणार आहे. जिल्हा बँकेतील प्रतिनिधित्वाच्या दृष्टीने या निवडणुकीला सहकार क्षेत्रात विशेष महत्त्व आहे. २१ जागांपैकी ११ जागा बिनविरोध झाल्यानंतर उर्वरित १० जागांसाठी २ नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. महिला राखीव जागांवरील संभाव्य मतविभागणी आणि विविध तालुक्यांतील मतदारांची भूमिका यामुळे या निवडणुकीच्या निकालाकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## 'जागर आरोग्याचा - मुख्यमंत्री आरोग्य संवाद' उपक्रमातून जनजागृती

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

युवकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी, तसेच आयुर्वेदाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचे महत्त्व समजावे, या उद्देशाने सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या डॉ. एन. जे. पाऊलबुधे शिक्षणशास्त्र महाविद्यालयात 'जागर आरोग्याचा – मुख्यमंत्री आरोग्य संवाद' या उपक्रमांतर्गत युवकांचे आरोग्य या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. एन. जे. पाऊलबुधे आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राध्यापक डॉ. श्रद्धा असोपा यांनी विद्यार्थिनींना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयीन युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थिनींना आरोग्याचे महत्त्व पटवून देण्याबरोबरच दैनंदिन जीवनात आरोग्यदायी सवयींचा अंगीकार करण्याचा संदेश देण्यात आला. बदलती जीवनशैली, आहाराच्या सवयी आणि आरोग्याबाबतची जागरूकता या बाबी युवकांच्या जीवनात महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, हा या व्याख्यानामागील प्रमुख उद्देश होता. डॉ. श्रद्धा असोपा यांनी आपल्या व्याख्यानातून आरोग्याची काळजी घेण्याचे महत्त्व विशद केले. संतुलित आहार, नियमित दिनचर्या आणि निरोगी जीवनशैली यांचा आरोग्यावर होणारा परिणाम त्यांनी विद्यार्थिनींना समजावून सांगितला. आयुर्वेदाच्या दृष्टिकोनातून आरोग्याचे महत्त्व स्पष्ट करताना दैनंदिन जीवनात आरोग्यपूरक सवयी अंगीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

# गौरी शुगरकडून शेतकऱ्यांना प्रतिटन अतिरिक्त २०० रुपये

## अध्यक्ष बाबुराव बोत्रे पाटील । गाळपानंतर आठव्या दिवशी ऊस बिल जमा करण्याची दिली ग्वाही

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

हिरडगाव येथील गौरी शुगरने ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिवाळीची भेट जाहीर केली आहे. मागील गाळप हंगामात प्रतिटन ३१०० रुपये ऊसदर देणाऱ्या कारखान्याकडून दिवाळीपूर्वी आणखी २०० रुपये प्रतिटन देण्यात येणार आहेत. तसेच दिवाळीनिमित्त ऊस उत्पादकांना मोफत साखर वाटप करण्यात येणार आहे. यंदाच्या गाळप हंगामात कारखान्याला ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर आठव्या दिवशी ऊस बिलाची रक्कम जमा केली जाईल, अशी ग्वाही ओंकार शुगर ग्रुपचे अध्यक्ष बाबुराव बोत्रेपाटील यांनी दिली.

हिरडगाव येथील गौरी शुगरच्या चौथ्या गाळप हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन व गाळप हंगामाचा शुभारंभ संचालक रेखा बोत्रेपाटील आणि ओमराजे बोत्रेपाटील यांच्या हस्ते करण्यात आला.




यावेळी आयोजित कार्यक्रमात बाबुराव बोत्रेपाटील बोलत होते.

बोत्रेपाटील म्हणाले की, ओंकार शुगर ग्रुपने ३५ साखर कारखाने चालविण्यापर्यंत मजल मारली असून, जागतिक साखर उद्योगात मोठा समूह म्हणून ओळख निर्माण केली आहे. शेतकऱ्यांच्या शेअर्सपोटी एक रुपयाही घेतलेला नाही. शासनाची कोणतीही सवलत घेतलेली नसल्याचे सांगत त्यांनी सहकार क्षेत्रातील कारखान्यांबाबतही भाष्य केले.

यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे ऊस गाळप कमी होण्याची शक्यता आहे. असे असले तरी अहिल्यानगर जिल्ह्यातील गौरी शुगर शेतकरी आणि ऊस वाहतूकदारांच्या खात्यावर आठव्या दिवशी रक्कम जमा करणार आहे. शेतकऱ्यांना वेळेत पैसे देण्याची भूमिका कारखाना यापुढेही कायम ठेवेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मण फराटे यांनी केले. टिळक भोस आणि नवनाथ शितोळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी संचालक रेखा बोत्रेपाटील, ओमराजे बोत्रेपाटील, उद्योग समूहाच्या सीईओ तेजस्विनी बर्गे, सचिन चौधरी, संतोष दरेकर, कुंडलिक बनकर, भूषण बडवे आणि सरव्यवस्थापक वसंत जरमळ आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन विशाल चव्हाण यांनी केले, तर नवनाथ दरेकर यांनी आभार मानले.

## पारनेर बाजार समितीत कांद्याला प्रतवारीनुसार १ हजार ते ५ हजार ५०० रुपये भाव



**● पारनेर । वीरभूमी–**

पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीत रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक झाली. बाजार समितीत एकूण १९ हजार ४५९ गोण्यांची आवक नोंदविण्यात आली असून, त्याचे एकूण वजन १० हजार २०२ क्विंटल आहे. कांद्याला गुणवत्ता आणि प्रतवारीनुसार प्रतिक्विंटल १ हजार ते ५ हजार ५०० रुपये बाजारभाव मिळाल्याची माहिती बाजार समितीच्या वतीने देण्यात आली.

आजच्या बाजारात गावरान कांद्याच्या १७ हजार ५३ गोण्यांची आवक झाली. त्याला प्रतवारीनुसार पुढीलप्रमाणे बाजारभाव मिळाले.

**४ ते ५ वक्कल : ५१०० ते ५२०० रुपये**
**नंबर १ : ४८०० ते ५००० रुपये**
**नंबर २ : ४००० ते ४७०० रुपये**
**नंबर ३ : ३००० ते ३९०० रुपये**
**गोल्टी–गोल्टा : ३२०० ते ४००० रुपये**

**लाल कांद्याला ५५०० रुपयांपर्यंत भाव**

लाल कांद्याची २४०६ गोण्यांची आवक झाली. लाल कांद्याच्या प्रतवारीनुसार बाजारभाव पुढीलप्रमाणे नोंदविण्यात आले.

**४ ते ५ वक्कल : ५३०० ते ५५०० रुपये**
**नंबर १ : ४९०० ते ५२०० रुपये**
**नंबर २ : ४४०० ते ४८०० रुपये**
**नंबर ३ : ३२०० ते ४००० रुपये**
**गोल्टी–गोल्टा : ३४०० ते ४१०० रुपये**

पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतमालाची जाहीर लिलाव पद्धतीने विक्री केली जाते. कांद्याची गुणवत्ता, आकार आणि प्रतवारीनुसार बाजारभाव निश्चित होत असल्याने शेतकऱ्यांनी विक्रीच्या वेळी बाजारात उपस्थित राहावे, असे आवाहन समितीने केले आहे. लिलावानंतर मिळालेला भाव पसंत नसल्यास नियमानुसार विक्री स्थगित करण्याचा अधिकार शेतकऱ्यांना आहे.

लाल कांदा व्यवस्थित वाळवून, सुकवून आणि योग्य प्रतवारी करूनच विक्रीसाठी आणावा, असेही समितीने सांगितले आहे. बाजारभावाची अधिकृत माहिती मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या ु.ीराल. ले या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन सभापती, उपसभापती आणि संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## आदिनाथ ढाकणे यांचा नवी दिल्लीत 'राष्ट्रीय जलप्रहरी २०२६' पुरस्काराने सन्मान

**● कोपरगाव । वीरभूमी–**

गेल्या तब्बल ३९१ आठवड्यांपासून कोपरगाव शहरातून वाहणाऱ्या पवित्र दक्षिणवाहिनी गोदावरी नदीच्या स्वच्छतेसाठी अखंडपणे कार्य करणारे स्वच्छतादूत व पर्यावरणप्रेमी आदिनाथ गोरखनाथ ढाकणे यांना त्यांच्या उल्लेखनीय जलसंवर्धन व नदी स्वच्छता कार्याची दखल घेत 'जल प्रहरी २०२६' या राष्ट्रीय पुरस्काराने नवी दिल्ली येथे सन्मानित करण्यात आले.



नवी दिल्ली येथील पंतप्रधान संग्रहालयाशेजारील विश्व युवक केंद्राच्या सभागृहात शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी 'सुजलम भारत की दिशा में एक पहल' या उपक्रमाच्या सातव्या संस्करणांतर्गत 'जल प्रहरी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. देशभरातील विविध राज्यांमध्ये नदी पुनर्वसन, जलसंवर्धन व पर्यावरण रक्षणासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जलदूतांचा यावेळी राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला.

केंद्रीय जलसंसाधन राज्यमंत्री ना. राजभूषण चौधरी तसेच जलपुरुष व मॅगसेसे पुरस्कार प्राप्त डॉ. राजेंद्र सिंह आयोजक डॉ अनिल सिंह यांच्या शुभहस्ते आदिनाथ ढाकणे यांना 'जल प्रहरी २०२६' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'वाल्याचा वाल्मिकी' ही म्हण तंतोतंत लागू पडावी, अशा पद्धतीने आदिनाथ ढाकणे यांनी कोपरगावातील गोदावरी नदी स्वच्छतेचे कार्य हाती घेतले आहे. गोदामाई प्रतिष्ठानच्या सहकार्याने गेल्या ३९० आठवड्यांपासून ते सातत्याने गोदावरी नदी स्वच्छतेचे कार्य करीत आहेत. केवळ नदी स्वच्छतेपुरते मर्यादित न राहता त्यांनी परिसरात अनेक फुलझाडे, औषधी वनस्पती व विविध वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन केले आहे.

कोपरगाव नगरपालिकेचे स्वच्छतादूत म्हणूनही ते कार्यरत असून, महाराष्ट्र शासनाच्या नदी संवर्धन उपक्रमात जलप्रहरी म्हणून त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. पर्यावरण संवर्धनाची कोणतीही मोठी संस्था किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरणप्रेमाची ओळख निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून आदिनाथ ढाकणे यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

त्यांच्या या सातत्यपूर्ण व उल्लेखनीय कार्याची यापूर्वीही विविध राज्यस्तरीय, राष्ट्रीय, शासकीय तसेच निमशासकीय संस्थांनी दखल घेत अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव केला आहे. मात्र, नवी दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावर झालेला 'जल प्रहरी २०२६' पुरस्काराचा सन्मान हा त्यांच्या ३९१ आठवड्यांच्या अखंड नदी स्वच्छता अभियानाला मिळालेली विशेष पावती मानली जात आहे.

आदिनाथ ढाकणे यांच्या या अद्वितीय कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेत त्यांना मिळालेला हा सन्मान अहिल्यानगर जिल्ह्यासह संपूर्ण कोपरगाव तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरला आहे.

या कार्यक्रमास दिल्लीचे खासदार अरुण सिंह, भाजपा प्रदेश महामंत्री योगिता सिंह, प्रो. गोपाल आर्य, लोकेश मुनी यांच्यासह देशभरातून आलेले जलसंवर्धन क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते.

# कोजागिरी पौर्णिमेला श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर भाविकांचा महासागर!

## दर्शनासाठी अभूतपूर्व गर्दी । देवस्थानच्या चोख नियोजनामुळे वाहतूक व दर्शन व्यवस्था सुरळीत

**● पाथर्डी । वीरभूमी–**

शारदीय नवरात्रोत्सवाची सांगता आणि कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर रविवारी भाविकांचा अभूतपूर्व जनसागर उसळला. 'उदो बोला, उदो अंबाबाई माऊलीचा'च्या जयघोषाने संपूर्ण गड परिसर भक्तिमय झाला होता. नवरात्रोत्सवात काही कारणांमुळे दर्शनासाठी येऊ न शकलेले भाविक, दर पौर्णिमेला देवीच्या दर्शनासाठी येणारे श्रद्धाळू तसेच नवसपूर्तीसाठी आलेल्या महिला भाविकांच्या मोठ्या गर्दीने गड फुलून गेला होता. भाविकांची प्रचंड संख्या आणि वाहनांची वाढलेली वर्दळ असतानाही देवस्थान प्रशासनाने केलेल्या नियोजनामुळे दर्शन व वाहतूक व्यवस्था सुरळीत राहिली.

गडाकडे येणारे रस्ते, पायऱ्या आणि मंदिर परिसर भाविकांनी गजबजून गेला होता. राज्याच्या विविध भागांतून हजारो भाविकांनी मोहटादेवीच्या दर्शनासाठी हजेरी लावली. वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने गडाच्या परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मात्र, देवस्थानच्या सुरक्षा रक्षकांनी वाहनांच्या पार्किंगचे योग्य नियोजन केल्याने भाविकांना फारशी गैरसोय सहन करावी लागली नाही. वाहनांना मंदिरापर्यंत पोहोचता येईल, अशी व्यवस्था करण्यात आल्याने ज्येष्ठ नागरिकांसह अनेक भाविकांनी समाधान व्यक्त केले.

कोजागिरी पौर्णिमेच्या यात्रेचे विशेष आकर्षण ठरली ती महिला भाविकांची मोठी उपस्थिती. मोहटादेवीवर अपार श्रद्धा असलेल्या अनेक महिला आपल्या मनोकामना पूर्ण झाल्यानंतर देवीला नवस फेडण्यासाठी गडावर येतात. 'माते, माझी मनोकामना पूर्ण होऊ दे. पौर्णिमेला पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून नऊ सुवासिनींना भोजन देईन,' असा नवस अनेक महिला बोलतात. मनोकामना पूर्ण झाल्यानंतर राज्याच्या विविध भागांतून महिला नऊ सुवासिनींना सोबत घेऊन गडावर येतात. त्यांना मान-सन्मानाने पुरणपोळीचा महाप्रसाद देऊन श्रद्धापूर्वक नवसपूर्ती केली जाते. या पारंपरिक धार्मिक प्रथेमुळे गडावर महिला भाविकांची विशेष गर्दी पाहायला मिळाली.

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन श्री मोहटादेवी देवस्थान विश्वस्त मंडळाच्या वतीने पिण्याचे पाणी, वाहनतळ, दर्शनरांग आणि इतर आवश्यक सुविधांचे नियोजन करण्यात आले होते. गर्दीच्या काळातही भाविकांना दर्शनासाठी अडचणी येऊ नयेत, यासाठी देवस्थानचे सुरक्षा रक्षक व कर्मचारी सतर्क होते. रस्त्यांवर आणि मंदिर परिसरात मोठी गर्दी असूनही शिस्तबद्ध वातावरणात दर्शन सोहळा पार पडला. प्रशासनाच्या नियोजनामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त पुणे येथील भाविक आनंद दळवी यांच्या वतीने देवीच्या मुख्य गाभाऱ्यात विविध रंगांच्या फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. या



फुलसजावटीमुळे मंदिराच्या गाभाऱ्याला विशेष धार्मिक आणि प्रसन्न स्वरूप प्राप्त झाले होते. तसेच पाथर्डी आगाराच्या वतीने राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी वाजतगाजत देवीला साडी अर्पण केली. यावेळी देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराज खाडे यांनी दर्शनासाठी आलेल्या भाविकांचे स्वागत केले. आज दिवसभरात पार पडलेल्या विविध धार्मिक कार्यक्रमांचे पौराहित्य देवस्थानचे पुजारी वेदशास्त्रसंपन्न भूषणदेवा साकरे, भास्कर देवा यांनी केले.

शारदीय नवरात्रोत्सवाची सांगता आणि कोजागिरी पौर्णिमेचा पवित्र सोहळा यामुळे श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर दिवसभर भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले. रात्री आयोजित कीर्तनाच्या कार्यक्रमामुळे या धार्मिक सोहळ्याला आध्यात्मिक अधिष्ठान लाभणार आहे. देवीच्या दर्शनासाठी लोटलेला भाविकांचा महासागर, नवसपूर्तीसाठी आलेल्या महिलांची श्रद्धा आणि देवस्थान प्रशासनाचे नियोजन यामुळे यंदाची कोजागिरी पौर्णिमा भाविकांसाठी विशेष ठरली.

# कर्मचाऱ्यांना न्याय मिळणे महत्त्वाचे, श्रेयवाद नव्हे!

**डॉ. सुजय विखे पाटील । साई संस्थानच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती, वेतनातील तफावत व पदोन्नतीचे प्रश्न सोडविण्यासाठी पाठपुरावा सुरुच ठेवणार**

**● शिर्डी । वीरभूमी –**

साईबाबासंस्थानच्याकर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर विखे पाटील परिवाराने सातत्याने पाठपुरावा केला आहे. मात्र, कर्मचाऱ्यांचे प्रश्न मार्गी लागत असतील, तर त्याचे श्रेय घेण्यापेक्षा त्यांना न्याय मिळणे महत्त्वाचे आहे. कर्मचाऱ्यांचे कल्याण होणे हा साईबाबांचा आशीर्वाद असून, राजकीय नेत्यांच्या कामाचे खरे मूल्यमापन जनतेच्या मतदानातूनच होते, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.

शिर्डी येथे श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेडच्या वतीने दीपावलीनिमित्त आयोजित शिधावाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सभासद आणि कर्मचाऱ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात शिधावाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने डॉ. विखे पाटील यांनी संस्थानच्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, सेवाशर्ती, वेतनातील तफावत, पदोन्नती आणि विश्वस्त मंडळाच्या नियुक्तीबाबत भूमिका मांडली.

डॉ. विखे पाटील म्हणाले की, मागील वर्षी दिवाळीच्या कार्यक्रमाला आल्यानंतर यंदाच्या दिवाळीपर्यंत ४८८ कर्मचाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागेल, अशी अपेक्षा होती. या प्रक्रियेत अनेकांनी प्रयत्न केले, संघर्ष केला आणि कामाचे श्रेय घेण्याचाही प्रयत्न केला. मात्र, कर्मचाऱ्यांचे कल्याण होणे हा साईबाबांचा आशीर्वाद आहे, अशी आपली भावना आहे. श्रेयवादापेक्षा कर्मचाऱ्यांना न्याय मिळणे महत्त्वाचे आहे.

४८८ कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर समाधान व्यक्त करतानाच काही कर्मचारी या प्रक्रियेत मागे राहिल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. मागील विश्वस्त मंडळाने किमान आठवी उत्तीर्ण असण्याची अट निश्चित केल्यामुळे दीर्घकाळ सेवा केलेल्या काही कर्मचाऱ्यांना लाभ मिळू शकला नाही. या कर्मचाऱ्यांचे प्रश्नही मार्गी लागले पाहिजेत आणि कोणावरही अन्याय होऊ नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

संस्थानमधील कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती, वेतनातील तफावत आणि पदोन्नती प्रक्रियेतील अडचणींवर भाष्य करताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, वेगवेगळ्या विश्वस्त मंडळांच्या काळात झालेल्या निर्णयांमुळे काही प्रश्न गुंतागुंतीचे झाले आहेत. समान शैक्षणिक पात्रता आणि समान अनुभव असूनही कर्मचाऱ्यांच्या वेतनात तफावत असणे योग्य नाही. सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय मिळण्याच्या दृष्टीने या प्रश्नांचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर प्रशासनाने वेळ देऊन सविस्तर चर्चा करावी. काही प्रश्न सामूहिक विचारविनिमयातून सोडविता येऊ शकतात. प्रशासनावर कामाचा मोठा ताण असला, तरी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

कर्मचाऱ्यांच्या अपेक्षा सातत्याने वाढत असतात. नोकरी, कायमस्वरूपी नियुक्ती, वेतनातील सुधारणा आणि इतर सेवासुविधा अशा विविध मागण्या पुढे येतात. जनतेची कामे करताना सक्षम नेतृत्वाने थांबता कामा नये. हा जनतेशी निर्माण झालेल्या विश्वासाचा आणि ऋणानुबंधाचा भाग असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संस्थानमधील वैद्यकीय आणि निमवैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधताना डॉ. विखे पाटील यांनी अधिक शैक्षणिक पात्रता असूनही काही कर्मचारी सेवासंधी आणि पदांच्या बाबतीत मागे राहिल्याचे सांगितले. कर्मचारी भरती नियमावलीतील तरतुदी, पात्रतेच्या अटी आणि त्यांची अंमलबजावणी यांचा फेरविचार होणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

परिचारिका आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांसाठी लागू केलेल्या पात्रतेच्या अटींबाबत बोलताना त्यांनी संबंधित पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि अतिरिक्त अटी यांचा तर्कसंगत मेळ असावा, असे मत व्यक्त केले. नियम लागू होण्याची तारीख आणि संबंधित कर्मचाऱ्यांची परिस्थिती लक्षात घेऊन निर्णय घेतले पाहिजेत. प्रशासनाच्या कायदेशीर मर्यादा विचारात घेऊन कर्मचाऱ्यांना न्याय देण्यासाठी व्यवहार्य उपाय शोधण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

साईबाबा संस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या नियुक्तीचा मुद्दाही डॉ. विखे पाटील यांनी उपस्थित केला. गेल्या चार दिवाळींपासून विश्वस्त मंडळ नियुक्त होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विश्वस्त मंडळ अस्तित्वात आल्यानंतर संस्थानमधील अनेक प्रलंबित प्रश्नांना गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकार, न्यायव्यवस्था आणि प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून संस्थानचे कामकाज सुरळीत होण्यास मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालयाने प्रलंबित विषयांवर निर्णय दिल्यामुळे संस्थानच्या कामकाजाला गती मिळाल्याचे नमूद करत त्यांनी न्यायालयाच्या भूमिकेचे अभिनंदन केले.



कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर निर्णय घेताना प्रशासनाला नियम आणि कायदेशीर चौकटीत काम करावे लागते. मात्र, काही प्रश्न सोडविण्यासाठी धोरणात्मक निर्णय आवश्यक असतात. अशा वेळी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन कर्मचाऱ्यांच्या हिताचे मार्ग शोधले पाहिजेत, असेही ते म्हणाले.

शिर्डी शहरातील आगामी विकासकामांची माहिती देताना डॉ. विखे पाटील यांनी कुंभमेळ्याच्या अनुषंगाने सुमारे ५० कोटी रुपयांची कामे सुरू असल्याचे सांगितले. तसेच साईबाबा संस्थानच्या माध्यमातून थीम पार्कसाठी ३० कोटी रुपयांच्या कामाला मंजुरी मिळाल्याचा उल्लेख केला. निविदा प्रक्रियेसह पुढील कामांना गती मिळाल्यानंतर शिर्डीच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शहरात स्टेडियम, नाट्यगृह आणि थीम पार्क यांसारख्या सुविधा उभारण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगत पुढील वर्षभरात शिर्डीच्या विकासाचे चित्र बदललेले दिसेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शहर स्वच्छ ठेवणे, अतिक्रमणांवर नियंत्रण ठेवणे आणि गुन्हेगारीमुक्त वातावरण निर्माण करणे यासाठी नगरपरिषदेचे पदाधिकारी आणि नगरसेवकांनी जबाबदारीने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

राजकीय श्रेयवादावर भाष्य करताना डॉ. विखे पाटील म्हणाले की, एखाद्या कामासाठी आपण प्रयत्न केले आणि संघर्ष केला, त्यामुळेच ते काम पूर्ण झाले असे प्रत्येकाला वाटू शकते. मात्र, राजकीय व्यक्तीच्या कामाचे अंतिम मूल्यमापन मतदानातूनच होते. लोकप्रतिनिधींचे काम योग्य नसेल, तर मतदार मतदानातून उत्तर देतात. त्यामुळे कोण काय बोलते किंवा कोण कोणावर आरोप करते, यापेक्षा जनतेचा कौल महत्त्वाचा आहे.

शिर्डीतील ग्रामस्थ, तालुक्यातील नागरिक, शेतकरी आणि साईबाबा संस्थानच्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर केलेल्या कामाचे मूल्यमापन जनता करेल. कोणाच्या आरोपांमुळे राजकीय भविष्य ठरणार नाही. साईबाबांचा आशीर्वाद आणि जनतेचा विश्वास यांवर आपली श्रद्धा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण हा एका दिवसाचा किंवा एका कार्यक्रमाचा विषय नसून, त्यांच्या भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची गरज आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांचे प्रश्नही संवेदनशीलतेने आणि सकारात्मक दृष्टिकोनातून सोडविण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्षनाथ गाडगीळकर, शिर्डीच्या नगराध्यक्षा जयश्री थोरात, विठ्ठलराव पवार यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी, संस्थानचे कर्मचारी आणि सोसायटीचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार सुखदेव फुलारी यांना 'निर्भीड पत्रकारिता पुरस्कार' प्रदान

**कांगोणी फाटा येथील संत सुडके महाराज आश्रमात राज्यस्तरीय साहित्य पुरस्काराचे वितरण**

**● नेवासा । वीरभूमी–**

नेवासा तालुक्यातील कांगोणी फाटा येथील संत सुडके महाराज आश्रमाच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्यात भेंडा येथील पत्रकार तथा जलमित्र सुखदेव फुलारी यांना 'निर्भीड पत्रकारिता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. सेवानिवृत्त न्यायाधीश वसंतराव पाटील आणि सिनेकलावंत बाळासाहेब शिंदे यांच्या हस्ते शाल, प्रशस्तिपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन साहित्यिकांसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

पारायण सप्ताहानिमित्त काल्याचे कीर्तन झाल्यानंतर आश्रमाचे प्रमुख बाळकृष्ण महाराज सुडके यांनी प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी आश्रमाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध आध्यात्मिक उपक्रमांची माहिती दिली.



या कार्यक्रमाला सेवानिवृत्त न्यायाधीश वसंतराव पाटील, सिनेकलावंत बाळासाहेब शिंदे, जनार्दन महाराज मुंडे, ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोकराव मिसाळ आणि आनंदवन सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष विनायक दरंदले उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते कथा संग्रह, आत्मचरित्र व व्यक्तिचित्रण, कादंबरी, प्रवासवर्णन, ललित साहित्य, नाटक, संत साहित्य, काव्यसंग्रह आणि बालसाहित्य अशा विविध साहित्य प्रकारांतील लेखकांना राज्यस्तरीय साहित्य गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पुरस्कारप्राप्त साहित्यिक पुढीलप्रमाणे : **कथा संग्रह :** सुनील मंगेश जाधव, आबासाहेब घावटे, काशिनाथ माटल. **आत्मचरित्र व व्यक्तिचित्रण :** डॉ. प्रमोद चौधरी, सतीश नाईकवाडे, विठ्ठल पांडुरंग पाटील. **कादंबरी :** शेखर खंडेराव फराटे, ऋषिकेश रोहिदास गोल्हार, राजेश चौरे. **प्रवासवर्णन :** सौ. वासंती प्रकाश घाडगे, प्राचार्य रेखा दीक्षित (कोल्हापूर), विजया लक्ष्मी देवगोजी. **ललित साहित्य** : डॉ. दिनेश वाघुंबरे, डॉ. योगेश गोतारणे, ऊर्मिला चाकुरकर. **नाटक :** उदय गणपत जाधव, डॉ. श्रीकांत पाटील. **संत साहित्य :** ज्ञानोबा दयारामजी हटवार. **काव्यसंग्रह :** इंद्रजित पाटील, एकनाथ देशमुख, अरविंदा राजधर भामरे, आकाश हरिभाऊ भोरडे, चंद्रकांत पोतदार. **बालसाहित्य :** उत्तम सदाकाळ, मुरहारी कराड, बबन शिंदे.

सोपानराव शिकारे यांना ग्रामीण उद्योग-व्यवसाय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अहिल्यानगर येथील डॉ. महेंद्र शिंदे यांना धन्वंतरी पुरस्कार, कु. प्राजक्ता कचरे यांना शैक्षणिक गुणवत्ता पुरस्कार, तर महेश रहाटळ यांना प्रगतिशील कृषी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ शिंदे यांनी केले, तर योगेश रासने यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी ओंकार महाराज सुडके यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दुष्काळाची कारणे आणि घ्यावयाची खबरदारी यावर रंगणार कवितांचा जागर!

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

दुष्काळाची कारणे, त्याचे परिणाम आणि दुष्काळी परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी याविषयी जनजागृती व्हावी, तसेच नवोदित कवींच्या लेखनकौशल्याला आणि काव्यप्रतिभेला हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने निमगाव वाघा येथे भव्य काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डांगरे डोंगरे व्यायामशाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दुष्काळासारख्या गंभीर सामाजिक प्रश्नावर काव्यलेखनातून जनजागृती घडवून आणणाऱ्या या उपक्रमात जास्तीत जास्त कवींनी सहभागी व्हावे, असे आवाहन डोफ्लगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी केले आहे.

स्पर्धेसाठी 'दुष्काळाची कारणे, घ्यावयाची खबरदारी' हा विषय निश्चित करण्यात आला आहे. या विषयाच्या माध्यमातून दुष्काळामागील कारणांचा वेध घेतानाच पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, पाण्याचे नियोजन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पाणी बचतीचे महत्त्व कवितेतून मांडण्याची संधी स्पर्धकांना मिळणार आहे.

या काव्यलेखन स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या कवींनी आपली कविता २८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी पाच वाजेपर्यंत आयोजकांनी निश्चित केलेल्या व्हॉट्सप क्रमांकावर पाठवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ऊस वाहतूक करणाऱ्या बेशिस्त चालकांवर कारवाई करा!

**रिफ्लेक्टरविना वाहनांमुळे अपघातांचा धोका । संभाजी ब्रिगेडचे नाना शिंदे यांचे पोलिसांना निवेदन**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

श्रीगोंदा तालुक्यात ऊस गळीत हंगाम सुरू झाला असून, रिफ्लेक्टरविना ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. ऊस वाहतूकदारांनी वाहतुकीचे नियम पाळावेत, तसेच नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष सानप यांना निवेदन दिले.

तालुक्यात सुमारे चार साखर कारखाने असून, गळीत हंगामामुळे ऊस वाहतुकीची मोठी वर्दळ सुरू आहे. मात्र, अनेक वाहनांना रिफ्लेक्टर आणि रेडियम नसल्याने रात्रीच्या वेळी अपघातांचा धोका निर्माण होत आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे सर्वसामान्य नागरिकांसह इतर वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

ट्रॅक्टरवर कर्ण कर्कश आवाजात साऊंड सिस्टिम वाजवणे, मद्यप्राशन करून वाहन चालवणे आणि वाहतुकीचे नियम धाब्यावर बसवणे असे प्रकारही सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा बेशिस्त वाहतुकीमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत असून, तालुक्यात यापूर्वी अनेकांना अपघातांत जीव गमवावा लागल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

ऊस वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना रिफ्लेक्टर व रेडियम लावणे बंधनकारक करावे, कर्कश आवाजातील साऊंड सिस्टिमवर नियंत्रण ठेवावे, मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्यांवर कारवाई करावी आणि वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

ऊस वाहतुकीतील बेशिस्तीला आळा घालण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांकडून आता कोणती कारवाई केली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

